# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ **Email Id:- rdc1osmanabad@gmail.com** फॅक्स क्र.०२४७२-२२८०१८


संदर्भ:- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
२. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७
३. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
४. महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम २०२०
५. महाराष्ट्र महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांची अधिसूचना दिनांक १३/०४/२०२०
६. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक १३/०४/२०२०
७. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र.४०/-३/२०२०-डीएम-१ (ए) दिनांक १४ एप्रिल २०२०
८. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र.४०/-३/२०२०-डीएम-१ (ए) दिनांक १५ एप्रिल २०२०

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दि. १६/~~०३~~ ०४/२०२०

**आदेश:-**

ज्याअर्थी, राज्या शासनाने करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागु करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमीत करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, या कार्यालयाचे दिनांक २१/०३/२०२० व ११/०४/२०२० रोजीच्या आदेशान्वये करोना विषाणुचा प्रादुर्भाव लक्षात घेता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मनाई आदेश लागु करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी, मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद मला प्राप्त अधिकारानुसार करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता सार्वजनिक स्थळी थुंकण्यावर बंदी, चेह-यांवर कायम मास्क/स्वच्छ रुमाल वापरणे, सोशल डिस्टसिंग पाळणे गरजेचे असल्याने याबाबीचे पालन व्हावे याकरीता खालील गैरकृत्याचे स्वरुप करणा-या व्यक्ती विरुध्द दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करणे बाबत आदेश पारीत करीत आहे.

| अ.क्र. | गैरकृत्याचे स्वरुप | प्रथम आढळल्यास करावयाची दंडात्मक कार्यवाही | दुस-यांदा आढळल्यास करावयाची कायदेशीर कार्यवाही | कार्यवाही करणारा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक स्थळी (रस्ते, बाजार, रुग्णालय, कार्यालय इ.) थुंकणे | रक्कम २००/- रु. दंड | फौजदारी कारवाई करणे | १. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.पं./ग्रा.पं.)<br>२. संबंधीत शासकीय विभाग प्रमुख (कार्यालय क्षेत्रामध्ये)<br>३. पोलिस विभाग |
| २ | सार्वजनिक स्थळी चेह-यांवर मास्क/स्वच्छ रुमाल न वापरणे /नाक व तोंड सुरक्षितपणे पुर्ण झाकलेले नसणे | रक्कम ५००/- रु. दंड | फौजदारी कारवाई करणे | १. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.पं./ग्रा.पं.)<br>२. संबंधीत शासकीय विभाग प्रमुख (कार्यालय क्षेत्रामध्ये)<br>३. पोलिस विभाग |
| ३ | १.दुकानदार/फळभाजीपाला विक्रेते /सर्व जीवनावश्यक वस्तु विक्रेते इत्यादी व ग्राहक | रक्कम २००/- रु. दंड (ग्राहक/व्यक्ती रक्कम रु. ५००/- | फौजदारी कारवाई करणे | १. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.प./ग्रा.पं.)<br>२. पोलिस विभाग |

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | यांनी सोशल डिस्टसिंग न राखणे.<br>२. ग्राहकांमध्ये कमीत कमी ३ फुट अंतर न राखणे,<br>३.विक्रेत्याने दुकानासमोर मार्कींग न करणे | दंड<br>(आस्थापना मालक/दुकानदार/विक्रेता | | |
| ४ | किराणा / जीवनावश्यक वस्तु विक्रेत्याने वस्तुंचे दरपत्रक न लावणे | रक्कम रु. १०००/- दंड | फौजदारी कारवाई करणे | १. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.पं./ग्रा.पं.)<br>२. संबंधीत शासकीय विभाग प्रमुख (कार्यालय क्षेत्रामध्ये)<br>३. पोलिस विभाग |

सदरील आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे, असे मानन्यात येईल. तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम २०२० अंतर्गत संवंधीतावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

सदर आदेश दिनांक ०३/०५/२०२० पर्यंत लागु राहतील.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
४. जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. उस्मानाबाद
६. जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र.जि.का. उस्मानाबाद
७. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत ) जि. प. उस्मानाबाद
८. जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद
९. सहा. नियंत्रक, वैद्यमापन शास्त्र (वजन व मापे) उस्मानाबाद
१०. कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, उस्मानाबाद
११. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि. प. उस्मानाबाद
१२. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
१३. Incident Commander, उपविभागीय दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१४. Incident Commander, तालुका दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१५.गट विकास अधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१६.मुख्याधिकारी, नगर पालिका, उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहारा, मुरुम, भुम, परंडा, वाशी , कळंब यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

16/4/20
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

Scanned by CamScanner